महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामांवरील हजेरीपट (e-muster) ग्राम पंचायतस्तरावरून निर्गमित करण्याची कार्यपध्दती संपुर्ण राज्यात राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१७/प्र.क्र.१३५/मग्रारो-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ डिसेंबर,२०२३

**वाचा :-**

१) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारित- २०१४)
२) म.गा.रा.ग्रा.रो. हमी कायदा, २००५
३) आयुक्त, मनरेगा, नागपुर यांचे पत्र क्र.आयुक्तालय/मगांराग्रारोहयोनहा/MIS/३०६२/२०२३, दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारित सन २०१४) पासुन रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ महाराष्ट्रामध्ये लागु केला आहे. याअंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामावरील हजेरीपट (e-muster) प्रचलित पद्धतीप्रमाणे न काढता त्यासाठी ग्रामपंचायतीला प्राधिकृत करणे व ग्रामपंचायत पातळीवरच ई-मस्टर निर्गमित करण्याची कार्यवाही करणे, त्यासाठी ग्रामपंचायतीला क्षमताबांधणी करणे व ई-मस्टर निर्गमित करण्याची कार्यवाही आपले सरकार पोर्टल मार्फत करण्याबाबतची कार्यपद्धती वाचा येथील क्रमांक ३ अन्वये प्रायोगिक तत्वावर महाराष्ट्रातील ३५ तालुक्यामध्ये राबविण्यात आली होती.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांचे हजेरीपट (e-muster) ग्रामपंचायत स्तरावरुन निर्गमित करण्याबाबतची कार्यपध्दती महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये लागु केल्यास मजुरांची कामाची मागणी प्राप्त झाल्यानंतर ग्राम पंचायत स्तरावरुन Demand Upload करुन ई-मस्टरची प्रत वेळीच प्राप्त करुन घेणे शक्य आहे. तसेच, ग्राम रोजगार सेवकाला तालुका स्तरावर कामाची मागणीनुसार मजुरांची यादी तालुक्याला पोहचण्याकरिता लागणारा कालावधी, हजेरीपट (e-muster) प्राप्त करुन घेण्याकरिता लागणारा वेळ देखील वाचेल. परिणामी डाटा एंट्री करिता होणारा विलंब टाळता येईल. सबब महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हजेरीपट (e-muster) ग्रामपंचायत स्तरावरुन निर्गमित करण्याबाबतची कार्यपध्दती महाराष्ट्रातील प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र या योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरुन मजुरांचे हजेरीपट (e-muster) निर्गमित करण्याबाबतची कार्यपध्दती महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात यावी.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना अकुशल वेतन त्या कामाचे हजेरीपट बंद झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे. विहित मुदतीमध्ये वेतन मजुरांना प्रदान करताना कार्यालयीन यंत्रणेला सुलभता व्हावी व त्याचप्रमाणे या योजनेच्या कामामध्ये पारदर्शकता

रहावी व प्रत्येक हजेरीपटाची नोंद MIS वर करुन हजेरीपटाचे संनियंत्रण करता यावे यासाठी केंद्र शासनाच्या सुचनेवरुन हजेरीपट (e-muster) पद्धती अमलात आली आहे.

ई-मस्टर निर्गमित करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक आहे.

१) सदर कामावर हजर राहणा-या अपेक्षित मजुराची यादी प्राप्त झाल्यानंतर www.nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरुन GP Login मध्ये जावुन demand upload करणे.(D.3 Works Demand- demand for work entry)

२) Demand upload झाल्यानंतर याच संकेतस्थळावरुन यादीतील मजुरांना Work allocation ची प्रक्रिया पुर्ण करणे (D.५ Works Allocation- work allocation entry) व तालुका स्तरावरील ई-मस्टरशी संबधीत ऑपरेटरला दुरध्वनीवरुन व ई-मेलद्वारे बाबीची सुचना देणे.

३) प्राप्त झालेल्या Demand नुसार तालुका स्तरावरील ऑपरेटर PO Login मधुन E-muster तयार करील (D.७.१-Generate E-muster Roll) सदर ई-मस्टरची प्रिंट GP Login मधुन काढणे.(D.७.२- E-Muster Roll- print E-Muster Roll)

४) प्रत्यक्षात काम सुरु झाल्यानंतर ७ दिवसाच्या कामाचे मोजमापानुसार मजुरी दराची नोंद घेऊन पुर्ण भरलेले ई-मस्टर ग्राम रोजगार सेवक डेटा एंट्री करेल (D.७.३-E-Muster Roll- Fill E-Muster Roll) व Wage list Generate(D.८ Wage List- Generate wage list for payment) व मजुरी प्रदानाच्या पुढील कार्यवाहीकरीता AAO Login ला पाठवेल. (D.८ Wage List- Add payment details to wage list & send).

जिल्हा MIS समन्वयक यांनी स्वत: तालुकास्तरावर जाऊन ग्रामपंचायतस्तरावर ई-मस्टर निर्गमित करण्याबाबतच्या प्रक्रियेबाबत संबंधीत ग्राम पंचायतीतील, सर्व संबंधित व्यक्तींना प्रशिक्षण देतील. तसेच, सर्व ग्राम पंचायतींचे GP Log in करिता User Name व Password उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही तालुका स्तरावरील नरेगा सेल मार्फत करण्यात येईल.

ग्रामपंचायतस्तरावर ई- मस्टर निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही सुरळीतपणे होण्यासाठी सर्व संबंधितांमध्ये समन्वयाकरीता आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपुर या कार्यालयामार्फत वेळोवेळी आढावा घेऊन सुचना करण्यात येतील. तसेच, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी व संनियंत्रण देखील सदर कार्यालयामार्फत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २०१७०२१८११०५३५८१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( संजना खोपडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता -**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -३२
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई-३२
४. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
७. सर्व विभागीय आयुक्त
८. आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-३२ (प्रसिध्दिकरिता)
११. जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व
१२. प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
१३. संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
१५. संचालक, फलोत्पादन, पुणे
१६. संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
१७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१८. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
२०. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (मुंबई, मुंबई उपनगरे वगळून) सर्व
२१. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
२२. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
२५. कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
२६. निवडनस्ती (रोहयो-१)